**महाराष्ट्र शासन**
**सक्षम प्राधिकारी तथा अपर मुख्य सचिव**
*अल्पसंख्याक विकास विभाग,*
*मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.*

३७७

क्रमांक:अशैसं-२०१२/प्र.क्र.१००/२०१२/का.५,

दिनांक :- २३.०५.२०१२

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

**सोसायटी ऑफ सेंट फ्रॉन्सीस झेविअर, पिलर, इंडिया, फॉदर एग्नल आश्रम, बॅन्ड स्टॅन्ड, बांद्रा (प), मुंबई -४०० ०५०** या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस **धार्मिक** अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.०८.१२.२०११ रोजी अर्ज सादर केला होता. दि. २३.०५.२०१२ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या **धार्मिक (ख्रिश्चन)** अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला **धार्मिक** अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला **धार्मिक** अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी. एफ. थेकेकरा

***(डॉ. टी. एफ. थेकेकरा)***
*सक्षम प्राधिकारी तथा अपर मुख्य सचिव*
*अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन*
*मंत्रालय, मुंबई-४०००३२*

**CERTIFIED TRUE COPY**
**For SOCIETY OF ST. FRANCIS XAVIER PILAR**
**TRUSTEE**